ePaper

|| वर्ष - 6 | अंक - 246 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, 20 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## राज्य सरकारची मतपेरणी; 52 हजार कोटींच्या पुरवणी मागण्या



### आतील पानांत


- केंद्राने शेतीमालाच्या किमान हमीभावाचा कायदा करावा!
- आयुष्य बदलवणारा एक क्षण
- मुंबई उच्च न्यायालयाचा एकनाथ शिंदेंना दणका


# पवनाथडी : 3 दिवसांत सव्वा 2 कोटीची उलाढाल!

## प्रतिदिन सरासरी साडेतीन लाखांपेक्षा अधिक नागरिकांची भेट

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून दि.१६ डिसेंबर ते १८ डिसेंबर या तीन दिवसाच्या कालावधीत सुमारे सव्वा दोन कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. प्रतिदिन सरासरी साडेतीन लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी पवनाथडीला भेट दिली आहे. गत पवनाथडी जत्रेच्या तुलनेत यावर्षी नागरिकांच्या संख्येत वाढ झाली असून आर्थिक उलाढाल देखील वाढली असल्याची माहिती उपआयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी दिली आहे.**



महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सांगवी येथील पीडब्लूडी मैदानावर पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१६ डिसेंबर ते २० डिसेंबर या कालावधीत होत असलेल्या पवनाथडी जत्रेत खाद्यपदार्थांसह विविध वस्तूंच्या विक्रीचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत.

महापालिकेच्या वतीने सुमारे सातशे पेक्षा अधिक महिला बचत गटांना व्यवसाय करण्यासाठी स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात आले असून या ठिकाणी त्यांच्याद्वारे व्यवसाय करण्यात येत आहेत. स्टॉल्सचे विविध विभागात वर्गीकरण करण्यात आले असून त्यामध्ये शाकाहारी, मांसाहारी आणि इतर वस्तू असे विभाग करण्यात आले आहेत. तसेच महिला बचत गटांना व्यवसाय करण्यासाठी स्टॉल्ससह टेबल, खुर्च्या, विद्युत व्यवस्था देखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, रुग्णवाहिका, अग्निशामक बंब, सुरक्षा यंत्रणा, मदत कक्ष अशा सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

महापालिकेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे दिव्यांगांसाठी स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात आले आहे. शिवाय, यंदा प्रथमच तृतीयपंथीय घटकांसाठी देखील स्टॉल्स उपलब्ध करुन देण्यात आले असून या बचत गटांनी खाद्यपदार्थांचे स्टॉल्स सुरु केले आहे. या स्टॉल्सला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे, असेही त्यांनी सांगितले.

### जत्रेस भेट देणाऱ्या लोकांची संख्या विक्रमी

**महिला बचत गटांना सक्षम करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या स्टॉल्समध्ये राज्यातील विविध विभागातून आलेल्या महिला बचत गटांनी आपल्या खाद्यसंस्कृतीचा थाट मांडला आहे. मासे, मटन, चिकन, विविध प्रकारच्या बिर्याणी अशा विविध मांसाहारी पदार्थांचे आस्वाद घेण्यासाठी लोकांनी एकच गर्दी केली. शाकाहारी खवय्यांना पुरणपोळी, पुरण मांडा, सुकामेवा पासून बनवलेली विविध प्रकारची चिक्की, उकडीचे व विविध प्रकारचे मोदक, छोले मटार करंजी, खोबर करंजी, छोले भटुरे, दिल्ली चाट, गुजराती ढोकळा, फाफडा, दक्षिण भारतीय खाद्य पदार्थ, महाराष्ट्रीयन झुणका भाकरी, थालीपिट, मेथी धपाटे अशा रुचकर भोजनाचा आस्वाद घेण्यासाठी लोक मोठ्याप्रमाणात जत्रेला भेट देत आहेत. त्यामुळे तीन लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी आतापर्यंत पवनाथडी जत्रेला भेट दिली असून यंदा जत्रेस भेट देणाऱ्या लोकांची संख्या विक्रमी असेल, तसेच आर्थिक उलाढाल देखील विक्रमी होईल, असे उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी सांगितले.**

# पवना नदीत सोडले जातेय ड्रेनेजचे पाणी, अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष!

## खासदार श्रीरंग बारणे : महापालिका प्रशासनाने गांभिर्याने लक्ष देण्याची मागणी

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



**रावेत बंधाऱ्यापासून ते मोरया गोसावी घाटापर्यंत ड्रेनेजचे पाणी थेट पवना नदीच्या पात्रात सोडले जाते. त्याकडे महापालिका अधिकाऱ्यांचे लक्ष नाही. नदीपात्रामध्ये सोडल्या जाणाऱ्या ड्रेनेजच्या पाण्यामुळे पाणी अशुद्ध होते. दुर्गंधी मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे नैसर्गिक जीवितहानी होत आहे. जलचर प्राणी मृत पावले जात आहेत. याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला केली आहे.**



याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पत्र पाठविले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, पवना नदी पिंपरी-चिंचवड शहरातून वाहते. शहरातून वाहणाऱ्या पवना नदीचे पात्र 24 किलो मीटर आहे.

पवना नदी क्षेत्रातील केजुदेवी बंधाऱ्याजवळ मोठ्या संख्येने मृत मासे आढळले आहेत. पवना नदी पात्रातील पाणी मोठ्या प्रमाणात दूषित झाले आहे. रावेत बंधाऱ्यापासून ते मोरया गोसावी घाटापर्यंत ड्रेनेजचे पाणी थेट नदीपात्रात सोडले जाते. त्याकडे महापालिका अधिकाऱ्यांचे लक्ष नाही.

नदीपत्रातील पाणी अशुद्ध झाले आहे. दुर्गंधी मोठ्या प्रमाणे होत असल्यामुळे नैसर्गिक जीवितहानी होत आहे. बंधाऱ्यातील पाणी दुषीत झाल्याने मासे व इतर जलचर प्राणी मृत पावले आहेत. ही बाब गांभीर्याने घ्यावी. पवना नदीपात्रातील पाणी हे पिंपरी-चिंचवडकरांसाठी पिण्यासाठी वापरले जाते. नदीपात्रातील पाणी अशुद्ध होत असल्याकारणाने शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. पवना नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. पवनमाई सुंदर, स्वच्छ ठेवण्यासाठी तातडीने कठोर पाऊले उचलावीत. आपण स्वतः याकडे गांभीर्याने लक्ष्य द्यावे. योग्य ती कार्यवाही करावी, अशी सूचना खासदार बारणे यांनी केली आहे.

# शेतीमालाच्या किमान हमीभावाचा कायदा करा!

## श्रमिक शेतकरी संघटनेचे नेते सुभाष काकुस्ते, राजेंद्र बावके यांची मागणी

**पुणे**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**केंद्र सरकारने शेतीच्या पिकांना किमान हमीभाव देणारा खास कायदा करावा, नवीन वीज कायदा आणि शेती कचरा जाळण्याबाबतचा करण्यात आलेले कायदा हे दोन्ही कायदे त्वरित मागे घ्यावेत, या प्रमुख मागण्यांसह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर अखिल भारतीय किसान महासभेच्या सोमवारी (ता.१९) झालेल्या राष्ट्रीय कार्यकारी मंडळाच्या बैठकीत प्रदीर्घ चर्चा करण्यात आली. या मागण्यांच्या पुर्ततेसाठीचे काय भूमिका घ्यायची, याबाबतचा निर्णय उद्या (मंगळवारी) जाहीर केला जाणार आहे.**

अखिल भारतीय किसान महासभेच्या राष्ट्रीय कार्यकारी मंडळाची दोन दिवशीय बैठक आज सुरु झाली. या बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष रुल्दुसिंग (पंजाब), महासचिव राजाराम सिंह, (बिहार), जयप्रकाश (उत्तर प्रदेश), प्रेमसिंग गेहलोत (राजस्थान), फुलचंद घेवा (हरियाना), गुरनाम सिंग (पंजाब) हे अध्यक्ष मंडळातील सदस्य उपस्थित आहेत. देशातील १८ राज्यांमध्ये अखिल भारतीय किसान महासभेचे काम चालते.




### किसान महासभेच्या प्रमुख मागण्या

- दिल्लीतील शेतकरी आंदोलनात मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना मदत करावी.
- लखीमपूर येथे शेतकऱ्यांना चिरडून मारण्याच्या घटनेप्रकरणी केंद्रीय मंत्री अजयकुमार टेनी मिश्रा यांची हकालपट्टी करावी.
- केंद्रीय मंत्री अजयकुमार टेनी मिश्रा यांच्या मुलावर असलेल्या गुन्ह्याची जलद न्यायालयात सुनावणी व्हावी.
- आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत.
- कैदेत असलेल्या शेतकरी आंदोलकांची सुटका करावी.

महाराष्ट्रात श्रमिक शेतकरी संघटना व सत्यशोधक शेतकरी सभा या दोन संघटना अखिल भारतीय किसान महासभेशी संलग्नित आहेत .या दोन्ही संघटनांच्या निमंत्रणावरून ही अखिल भारतीय किसान महासभेच्या कार्यकारी मंडळाची बैठक पुणे महानगरपालिकेच्या कामगार युनियनच्या मदतीने पुणे शहरात होत आहे.

केंद्र सरकारने केलेले तीन नवीन कृषी कायदे मागे घेणे आणि शेतीमालाच्या किमान हमीभावाचा कायदा करण्याच्या मागणीसाठी दिल्ली सरहद्दीवर गाजीपूर , सिंघू, टिकरी, शहाजापूर येथील प्रमुख चार बॉर्डरवर वर्षभरापेक्षा अधिक काळ शेतकरी आंदोलन चालले होते. त्यात अखिल भारतीय किसान महासभेच्या संयुक्त किसान मोर्चाची उभारणी व दिल्ली आंदोलनात मोठा सहभाग होता. यापूर्वी बिहारमध्ये झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनात महासभेच्या अध्यक्षपदी रुल्दूसिंग व सरचिटणीसपदी राजारामसिंग यांची निवड झाली आहे. आता पुण्यातील बैठकीत राष्ट्रीय कार्यकारिणीसाठी वेगवेगळ्या राज्यातील उपाध्यक्ष, सहचिटणीस व अन्य पदाधिकारी यांची निवड केली जाणार असल्याचे सत्यशोधक शेतकरी सभेचे राज्य संघटक किशोर ढमाले,करणसिंग कोकणी, श्रमिक शेतकरी संघटनेचे नेते सुभाष काकुस्ते व राजेंद्र बावके यांनी बैठकीनंतर बोलताना सांगितले.

# लम्पीपीडित शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी

## पशुधनावर मोफत उपचारही करावेत, खासदार सुप्रिया सुळे यांची मागणी

**।पुणे ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

लम्पी आजारामुळे देशातील पशुधन आणि दुग्धव्यवसाय मोठ्या प्रमाणात प्रभावित झाला आहे. सुमारे ३० लाख जनावरांना लम्पी रोगाची लागण झाली असून, दीड लाखांहून अधिक जनावरे दगावली आहेत. या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासोबतच त्यांच्या पशुधनावर मोफत उपचारही करावेत, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी लोकसभेत केली. खासदार सुळे यांनी महाराष्ट्रासह देशभरात लम्पी आजारामुळे झालेल्या नुकसानीचा मुद्दा उपस्थित केला. या आजारामुळे हजारो शेतकऱ्यांनी पशुधन गमावले आहे. शिवाय, त्यांना मोठा आर्थिक भुर्दंड बसला आहे.

परिणामी दुग्धव्यवसाय अडचणीत आला असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान लक्षात घेता सरकारने मदत करणे गरजेचे आहे. ज्या शेतकऱ्यांची जनावरे दगावली आहेत त्यांना आर्थिक मदत देण्याबरोबरच मोफत उपचारही देण्याची गरज आहे. लम्पीचा प्रत्येक वेळी नवा विषाणू येत असल्याचे पशुतज्ज्ञांचे



म्हणणे याचा अर्थ हा किती घातक आजार आहे, ते लक्षात घ्यायला हवे. या रोगावर एकच लस प्रभावी ठरत नाही. त्यामुळे या रोगाचे आणखी संशोधन होऊन प्रभावी लस तयार केल्यास भविष्यात होणारे नुकसान टाळण्यास मदत होईल, असे त्यांनी या वेळी स्पष्ट केले. या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासोबतच त्यांच्या पशुधनावर मोफत उपचारही करावेत, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी लोकसभेत केली. खासदार सुळे यांनी महाराष्ट्रासह देशभरात लम्पी आजारामुळे झालेल्या नुकसानीचा मुद्दा उपस्थित केला. या आजारामुळे हजारो शेतकऱ्यांनी पशुधन गमावले आहे. शिवाय, त्यांना मोठा आर्थिक भुर्दंड बसला आहे. परिणामी दुग्धव्यवसाय अडचणीत आला असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.



### देशातील स्थिती

- लम्पीग्रस्त जनावरे : २९ लाख ५२ हजार २२३
- दगावलेली जनावरे : १ लाख ५५ हजार ७२४

### महाराष्ट्रातील स्थिती

- लम्पीग्रस्त जनावरे : ३ लाख ९५ हजार ४२६
- दगावलेली जनावरे : २८ हजार ३७

### लम्पी रोगाबाबत उपचार

- पशुसंवर्धन विभाग टोल फ्री क्रमांक १८००२३३०४१८
- राज्यस्तरीय कॉल सेंटर टोल फ्री क्रमांक १९६२

### शेतकऱ्यांना मिळणार 30 हजार आर्थिक मदत

**शेतकऱ्यांना मिळणार 30 हजार आर्थिक मदत. ज्या शेतकऱ्यांची दुधाळ किंवा इतर जनावरे लम्पी आजाराने दगावली असतील आशा शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने 30 हजार ते 16 हजार रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. शेतकऱ्यांना दिली जाणारी ही मदत राष्ट्रीय आप्पती निवारण धोरणामधील निकषानुसार दिली जाणार आहे. केंद्राने प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम 2009 यानुसार लम्पी हा जनावरांना होणारा चर्म रोग अनुसूचित करण्यात आलेला आहे. सध्या महाराष्ट्र राज्यातील एकूण 21 जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जनावरांना हा रोग झालेला आहे.**

# पुण्यात विद्यार्थ्यांचे ठिय्या आंदोलन

## राज्यसेवा मुख्य परीक्षा पॅटर्न राबवण्याची मागणी

**।पुणे।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

राज्यसेवा मुख्य परीक्षा पॅटर्न २०२५ पासून राबविण्यात यावा. या मागणीसाठी पुण्यातील शास्त्री रस्त्यावर स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे ठिय्या आंदोलन सुरू आहे. या आंदोलनात विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले असून विद्यार्थ्यांकडून जोरदार घोषणा देण्यात येत आहेत.

आम्ही विद्यार्थी मागील अनेक वर्षांपासून राज्यसेवा परीक्षेची तयारी करीत आहोत.पण अचानक आयोगाकडून आदेश काढला जातो की, २०२३ पासून तुमच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात येत आहे. हा निर्णय आम्हाला मान्य नाही. आयोगाने २०२५ मध्ये तो नियम लागू करावा अशी आमची राज्य सरकारकडे मागणी आहे. राज्य सरकार अनेक निवडणुका पुढे घेत जात आहे. त्यामुळे आमचा अभ्यासक्रमाचा निर्णय २०२५ पासून लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारला सहज शक्य आहे. त्यामुळे राज्य सरकारने विद्यार्थ्यांचा विचार करून निर्णय घ्यावा ,अन्यथा आम्ही तीव्र आंदोलन करू असा इशारा देखील विद्यार्थ्यांनी यावेळी दिला.



# बाईकटॅक्सी विरोधात आंदोलन!

## बाबा कांबळे : प्रश्न न सुटल्यास देशभर रिक्षाचालकांचा चक्काजाम

पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज ।



देशात संसदेचे व राज्यात विधानभवनाचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले आहे. यामध्ये रिक्षा चालकांच्या प्रश्नांवर प्रामुख्याने आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पुणे पिंपरी चिंचवड सह रिक्षा चालकांचे राज्यासह देशव्यापी होणाऱ्या आंदोलनाला सुरुवात झाली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील विभागीय कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करून मागण्यांकडे लक्ष वेधून घेणार असल्याचे ऑटो रिक्षा, टॅक्सी, बस ट्रान्सपोर्ट फेडरेशनचे व महाराष्ट्र रिक्षा पंचायत राष्ट्रीय अध्यक्ष बाबा कांबळे यांनी सांगीतले तसेच देशपातळीवर रिक्षा संघटनांची एकी झाली आहे.

माझ्यावर जबाबदारी दिली आहे. देशपातळीवर माझे नेतृत्व सिद्ध झाल्याने काही बोगस रिक्षा संघटनांचे प्रतिनिधी देखील वैयक्तिक पातळीवर टीका करत आहेत. रिक्षा चालकांचे प्रश्न मार्गी लावण्याऐवजी माझ्यावर करण्यात येत असलेली टीका ही द्वेष भावनेतून होतेय हे रिक्षा चालक मालकांच्या देखील लक्षात आले आहे. त्यामुळे त्यांच्याकडे लक्ष न देता मी रिक्षा चालक मालकांना व गोरगरीब कष्टकरी जनतेला न्याय मिळवून देणार असेही बाबा कांबळे म्हणाले.

हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर रिक्षा चालक, मालकांच्या विविध मागण्यांसाठी पुणे पिंपरी चिंचवड महाराष्ट्र सह देशभरातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालया वरती देशव्यापी रिक्षा टॅक्सी व टुरिस्ट परवाना असलेल्या बस संघटनांनी बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाला सुरुवात केली आहे. पिंपरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. पुणे विभागीय आयुक्त कार्यालयासमोर रिक्षा चालक मालकांनी धरणे आंदोलन सुरू केले असून या वेळी बाबा कांबळे रिक्षा चालकांना मार्गदर्शन करताना बोलत होते. महाराष्ट्र रिक्षा पंचायत, ऑटो रिक्षा संयुक्त कृती समिती, रिक्षा टॅक्सी फेडरेशन वतीने हे आंदोलन करण्यात आले.

या वेळी पुणे रिक्षा फेडरेशनचे अध्यक्ष अनंद तांबे, जय महाराष्ट्र रिक्षा संघटनेचे गुलाब सय्यद, महाराष्ट्र रिक्षा पंचायत चे विलास खेमसे, मोहम्मद शेख, बाळासाहेब ढवळे लक्ष्मण शेलार सोमनाथ कलाटे हे उपस्थित होते. रॅपिड मोबाईल आपलिकेशन मधून टू व्हीलर ची सुविधा हटवा. रॅपिडो ओला उबेर कंपनीवर जनतेचे फसवणूक केली म्हणून फसवणुकीचा गुन्हा दाखल करा. मान्यता नसताना टू व्हीलर टॅक्सी व्यवसाय करत असेल तर ही सेवा बेकायदेशीर म्हणून घोषित करा. रिक्षा चालक मालकांसाठी प्रलंबित असलेले कल्याणकारी महामंडळ तातडीने घोषित करा. मुक्त रिक्षा परवाना बंद करा ई रिक्षाला परवाना सक्तीचा करा. पिंपरी चिंचवड पुणे येथे मीटर कॅरीबॅशनची मुदत ३० जानेवारीपर्यंत वाढवा, या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले आहे.

### माझ्यावर अत्यंत खालच्या पातळीवर टीका

**बाबा कांबळे म्हणाले, गेल्या अनेक दिवसांपासून माझ्यावर काही रिक्षा संघटनांचे बोगस प्रतिनिधी वैयक्तिक पातळीवर खालच्या स्तराला जाऊन टीका करत आहे. काही जणांना आपल्या वडिलांचा वारसा जपता आलेला नाही. मी सर्वसामान्य कुटुंबातून वर आलेलो आहे. महाराष्ट्र रिक्षा पंचायतीच्या माध्यमातून रिक्षा चालक मालकांच्या व कष्टकरी जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. देश पातळीवर रिक्षा चालक-मालकांची एकी करून मोठं संघटन उभे करण्यात यशस्वी पुढाकार घेतला आहे. त्याला यश देखील प्राप्त झाले. त्यामुळे सर्व रिक्षा चालक मालकांनी देशपातळीवरची जबाबदारी माझ्यावर टाकली आहे. मी केलेल्या कामाचे हे फळ असल्याचे मी समजतो. मात्र माझे नेतृत्व मोठे होत असल्याचे पाहून अनेकांना पोटशुळ निर्माण होत आहे. त्यामुळे रिक्षा चालक मालकांचे प्रश्न सोडविण्याऐवजी माझ्यावर अत्यंत खालच्या पातळीवर टीका करत आहेत. वास्तविक रिक्षा चालक मालकांचे प्रश्न सोडवून न्याय देणे गरजेचे असताना देखील त्यांना संकटात टाकण्याची कामे बोगस संघटनांचे प्रतिनिधी करत आहेत. त्यांना रिक्षा चालक-मालक धडा शिकवतील, असेही बाबा कांबळे म्हणाले.**

# महापालिका कार्यक्षेत्रामधील रेडझोन क्षेत्राचे नकाशे, सर्व्हेची माहिती प्रसिद्ध करा

## माजी नगरसेविका सुलभा उबाळे यांची आयुक्तांकडे मागणी

पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।





**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील रेडझोन क्षेत्राचे नकाशे व सर्व्हेची माहिती प्रसिद्ध करण्याची मागणी माजी नगरसेविका सुलभा उबाळे यांनी महापालिकेकडे केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे.**

सुलभा उबाळे यांनी निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी- चिंचवड शहरामध्ये संरक्षण क्षेत्र म्हणजेच रेडझोनची हद्द काही ठिकाणी आहे. त्यामुळे या हद्दीमध्ये सामान्य नागरिकांना सुखसोयी मिळत नाहीत. तसेच मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचे कर्ज घेता येत नाही, जमीन विकसित करता येत नाही, जुने बांधकाम असेल तर त्याचा पुनर्विकास सुद्धा करता येत नाही. तसेच घरांची विक्री सुद्धा करता येत नाही. अशा असंख्य समस्या सामान्य नागरिकांना भेडसावत आहेत.

तसेच रेडझोन बाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे. यामध्ये कोणते क्षेत्र हे रेडझोन हद्दीमध्ये येते याची नागरिकांना पुरेशी कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

त्यामुळे पिंपरी- चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रामधील रेडझोन हद्दीबाबत सर्व्हे क्रमांक तसेच प्लॉट क्रमांकानुसार नकाशे आणि रेडझोनची हद्द नव्याने लवकरात लवकर प्रसिद्ध करण्यात यावेत. यामुळे सामान्य नागरिकाची होणारी फसवणूक थांबण्यास अटकाव होईल. यमुनानगर, त्रिवेणीनगर, रुपीनगर, मोरेवस्ती भागातील नागरिकांचे रेडझोन विषयी असलेले संभ्रम दूर होण्यास मदत होईल.

# 'एलजीबीटीं'नी रॅलीतून व्यक्त केला 'अभिमान'!



"**पिंपरी** : समलिंगी, उभयलिंगी, पारलिंगी, द्विलिंगी आणि इतर लैंगिक ( एलजीबीटी ) अल्पसंख्यांक समुदायाकडून पिंपळे सौदागर येथे रविवारी (दि. १८) अभिमान यात्रा काढण्यात आली. नका करू दुजेपणा हिजड्यांनाही आपले म्हणा, प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं, 'हमे हमारे हक दो जिओ और जिने दो', 'मारो ताली बजाओ सिटी एलजीबीटी -एलजीबीटी' अशा विविध घोषणा यावेळी देण्यात आल्या. एलजीबीटी समुदायाच्या हक्कांसाठी व विविध मागण्यांसाठी गेल्या काही वर्षांपासून लढा सुरू आहे. राज्यात पोलीस भरती प्रक्रियेत तृतीयपंथींना सामावून घेण्यात आले. त्यामुळे या समुदायाला मोठा दिलासा मिळाला. त्यानिमित्त ही अभिमान यात्रा काढण्यात आली. पिंपरी-चिंचवड , पुणे , सातारा तसेच इतर शहरातील विविध संघटनांनी या रॅलीत सहभाग घेतला.

## संपादकीय »

# एका प्रकल्पाची कथा नि व्यथा

***पायाभूत सुविधांचा विकासाचा प्रकल्प मार्गी लावताना किती गोष्टींचा विचार करावा लागतो, याची झलक मुंबईच्या "कोस्टल रोड" प्रकल्पाच्या निमित्ताने पाहायला मिळाली. वरळीच्या किनारपट्टीला आणि वरळी कोळीवाड्याला अनेक शतकांचा इतिहास आहे.***

वरळी कोळीवाडा सोडून आपल्याला वरळीमध्ये किंवा वरळी मार्गे होणाऱ्या कोणत्याही पायाभूत सुविधांचा विकासाचा विचार होणे कठीण आहे. मुंबईच्या "कोस्टल रोड" प्रकल्पाला खीळ या वरळीतच गेली पाच वर्षे लागलेली होती, ती देखील मुंबईच्या किनाऱ्यालगत होणाऱ्या मासेमारीमध्ये अडथळा येत असल्यामुळे. वरळी जवळून कोस्टल रोड सी लिंकला जोडला जात आहे. तेथील क्लीव्ह लॅण्ड बंदराजवळ दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या कनेक्टरचे काम सुरू होते. त्या पिलरमध्ये प्रस्तावित अंतर ६० मीटर होते. ज्यामुळे कोळ्यांच्या बोटांना ये जा करण्यासाठी अडथळा निर्माण होणार होता. हे अंतर वाढवण्याची मागणी मच्छिमार व्यावसायिकांनी केली होती. अखेरीस यासाठी नियुक्त केलेल्या समितीने दिलेल्या अहवालानुसार १२० मीटर अंतर करण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच केली. मच्छिमारांची मागणी किमान १६० ते २०० मीटर अंतर वाढविण्याची होती, मात्र त्यांनीही १२० मीटर अंतरावर समाधान व्यक्त केल्याने कोस्टल रोडचे वरळीत थांबलेले काम सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महापालिकेने या प्रश्नासाठी समिती नेमली होती. अभ्यासाअंती या समितीतील तज्ज्ञांनी दोन खांबांमधील अंतर १६० मीटर करण्याची शिफारस महापालिकेला केली होती. गेल्या दोन वर्षांपासून सुरु असलेल्या चर्चा, बैठकांनंतर अखेर वरळी इथल्या समुद्रामधील सात ते नऊ या तीन खांबांमधील क्रमांक आठ हा खांब रद्द करुन दोन खांबांमधील अंतर १२० मीटर ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला. त्यावर मच्छिमार संघटना आणि पालिका यांच्यात एकमत झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत असलेल्या नगरविकास विभागाने हिरवा कंदील दाखवला आहे.मुंबईसारख्या शहरातही स्थानिकांचा (कोळी समाज) पारंपरिक रोजगार हा मासेमारीचा आहे. त्यामुळे केवळ साठसत्तर बोटी मासेमारीसाठी वरळीहून जातात. म्हणून त्याकडे दुर्लक्ष केल्याने स्थानिकांच्या रोजगाराच्या हक्कावर गदा येत होती. पालिका आणि मच्छिमार यांच्यात अनेकदा संघर्ष झाला.



## आनंदी सकाळ

# परमेश्वर आनंदरूप, चिरंतन आहे

परमार्थाचा विषय तसा खरोखरच कठीण आहे आणि सर्वांना नडणारा आहे. ज्याला हा विषय जाणून घ्यायचा असेल त्याला, मी कोण हे जाणण्यापेक्षा, मी कोण नव्हे हे जाणणे महत्त्वाचे आहे. एखाद्या पाऊलवाटेने जात असताना ती वाट चुकलो आणि आपण भलत्या मार्गाला लागलो तर त्यापुढला सर्व व्यवहार चुकत जाणार. एखादे गणित सोडविताना एखाद्या आकड्याची चूक झाली की त्यापुढले सर्व गणित चुकत जाते किंवा एखाद्या रोगाचे निदान बरोबर झाले नाही तर मग त्या रोगावर केलेली औषधयोजना फुकट जाते, त्याप्रमाणे मनुष्याच्या सर्वसामान्य गुणधर्मांचे आकलन जर बरोबर झाले नाही, तर या गुणधर्मावर आधारलेला परमार्थाचा मार्गही जाणणे फार कठीण गोष्ट होईल. आपण आनंदी असावे, नेहमी आनंदात रहावे, असे सर्वांनाच वाटते; हा झाला पहिला गुणधर्म. या आनंदात चिरंतन असावे, निदान आनंदाच्या अपेक्षेत तरी चिरंतन रहावे, असेही आपल्याला वाटते.

# आयुष्य बदलवणारा एक क्षण



## भूमिका



आता काहीच दिवस उरलेत नवीन वर्ष सुरू होईल. अनेक लोक संकल्प करतील आणि खूप कमी लोक ते पूर्ण करतील. संकल्प करण्यासाठी काही जास्त लागत नाही, पण पूर्ण करण्यासाठी ‘सातत्य’ हे ठेवावे लागते आणि स्वत:सोबत प्रामाणिकसुद्धा राहावं लागतं. नवीन वर्ष येतंय म्हणूनच तुम्ही संकल्प केला पाहिजे असं अजिबात नाही. प्रत्येक दिवस वेगळा आहे. प्रत्येक दिवशी संधीसुद्धा नवीन असतात. काहींना प्रत्येक सकाळ, प्रत्येक क्षण सारखा वाटू शकतो, पण ते सत्य नाही. म्हणून आपल्या प्रत्येक क्षणावर एक वेगळा व नाविन्यपूर्णतेने जगण्याचा प्रयोग करून पाहा. कोणता क्षण कधी, कोणत्या क्षणी निसटून जाईल हे आपल्याला ठाऊक नसते किंवा ही संधी कधी, किती वर्षांनी येईल हे माहीत नसते. एका दिवसानंतर येईल, काही वर्षांनंतर येईल, पण तुमचा दिवस येईल हे नक्की.

तुम्ही मागे जाऊन एक नवी सुरुवात करू शकत नाहीत. त्यामुळे आजपासूनच नवी सुरुवात करा. चांगल्या सुरुवातीची अखेरही चांगली होऊ शकते. वाटेल त्या परिस्थितीतून तुम्ही प्रारंभाची सुरुवात करू शकता. सहा वर्षांच्या अध्ययनानंतर गौतम बुद्धांनाही असाच अनुभव आला आणि चाळीसाव्या वर्षी पैगंबरांनी हीच अनुभूती घेतली. जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी तिसाव्या वर्षी, कर्नल सेंन्डर्स यांना वयाच्या पासष्टाव्या वर्षी आणि या सर्वांप्रमाणे इतर महान लोकांनाही असाच अनुभव आला.


अनेक महान विभूतींचे वैशिष्ठ्य म्हणजे त्यांनी स्वप्न त्यांच्या चांगल्या काळात पाहिले नसून वाईट परिस्थितीत पाहिले होते. धीरूभाई अंबानींनी डिजिटल इंडियाचे स्वप्न १९९९ साली पाहिले होते, मात्र तेव्हा भारतात संवाद किंवा संपर्क करणे खूप कठीण गोष्ट होती. मानवी गरजांमध्ये अन्न, वस्त्र व निवारा याव्यतिरीक्त माहिती आणि संपर्काची सर्व साधने असण्याचे ते स्वप्न आज साकार झाल्याचे आपण पाहत आहोत. रतन टाटांनीदेखील असेच एक स्वप्न पाहिले होते. मध्यमवर्गीयांना एक लाख रुपयांपर्यंत कार उपलब्ध करून देण्याचे आणि न्यानोच्या रूपात ते सत्यातही उतरवले. देश पारतंत्र्यात असताना महात्मा गांधींनी स्वातंत्र्याचे स्वप्न पाहिले होते. इतर प्रगत देशांच्या तुलनेत भारताची वर्ल्ड क्लास विमान बनवण्याची पात्रता नव्हती. त्यावेळी मिसाईलमेन एपीजे अब्दुल कलामांनी असेच स्वप्न पाहिले होते आणि अंतराळ क्षेत्रातील आजचे भारताचे स्थान उल्लेखनीय आहे हे आपण सर्वच जाणतो. या सर्व गोष्टी सांगण्याचा मुद्दा हाच आहे की या नेत्यांनी प्रतिकूल परिस्थितीत स्वप्न पाहिले होते आणि पुढे त्यांच्याच स्वप्नाच्या जोरावर संघटना, देश आणि मानवता एकवटली गेली.

# पुरोगामी महाराष्ट्रात महिला कुलगुरूंची संख्या नगण्यच!

**अमरावती इथल्या संत गाडगेबाबा विद्यापीठाला येणाऱ्या २०२३ मध्ये ४० वर्षं पूर्ण होत आहेत. याशिवाय राज्यात चार स्वतंत्र कृषी विद्यापीठंदेखील कार्यरत आहेत. यापैकी राहुरी इथलं महात्मा फुले कृषी विद्यापीठ सर्वात जुनं.**

हे विद्यापीठ १९६८ मध्ये अस्तित्वात आलं. त्यानंतर १९६९ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला इथं सुरू झालं. दादासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी; ही दोन्ही विद्यापीठं एकाच वर्षी म्हणजे वर्ष १९७२ मध्ये स्थापन झाली. ही चारही विद्यापीठं कार्यान्वित होऊन अर्धशतकाचा काळ उलटलेला आहे.

नाशिकला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ तर लोणेरे (रायगड ) इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, ही दोन विद्यापीठं १९८९ मध्ये स्थापन झाली. जळगाव इथं कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ १९९० मध्ये सुरू करण्यात आलं. या तीनही विद्यापीठांची स्थापना होऊन तीन दशकं उलटली आहेत. औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार झाल्यावर या विद्यापीठाचं विभाजन करून १९९४ मध्ये नांदेड इथं स्वामी रामानंद तीर्थ



मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ, सोलापूर (२००४) आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली २०११ मध्ये अस्तित्वात आली आहेत.

या सर्व विद्यापीठांच्या स्थापना वर्षावर नजर टाकली असता असं लक्षात येतं की, १५० वर्षं ते ११ वर्षं एवढं यांचं वयोमान आहे. ही विद्यापीठं स्थापन झाल्यापासून आजपर्यंत किती आणि कोणत्या विद्यापीठांमध्ये महिला कुलगुरूंची नियुक्ती झाली आहे याचा शोध घेतला तर प्रचंड निराशा हाती लागते. (सध्याच्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार कुलगुरूपदाचा कार्यकाळ हा या पदावरील व्यक्तीने वयाची ६५ वर्षं पूर्ण होईपर्यंत किंवा अधिकतम पाच वर्षांचा असतो. एखाद्या कुलगुरूची निवड वयाच्या ६१ व्या वर्षी झाली तर ती व्यक्ती चार वर्षंच या पदावर राहू शकते.) एसएनडीटी महिला विद्यापीठाशिवाय इतर अनेक विद्यापीठांमध्ये एकदाही महिला कुलगुरूची निवड झालेली नाहीये. महर्षी कर्वे यांनी महिलांसाठी स्थापन केलेल्या एसएनडीटी विद्यापीठाच्या कायद्यात तरतूद केल्यानुसार इथं केवळ महिलेलाच कुलगुरू होण्याची संधी मिळते. (त्यामुळे इथं १९४२ ते २०२१ या कालखंडात १४ महिलांना कुलगुरूपदावर काम करण्याची संधी मिळाली आहे.) १५० वर्षं जुन्या मुंबई विद्यापीठात आतापर्यंत फक्त दोनदा महिला कुलगुरू झाल्या आहेत.

डॉ. मेहरू बेंगाली १९८६ ते १९९२ आणि डॉ. स्नेहलता देशमुख १९९५ ते २००० या कालावधीत इथं कुलगुरू होत्या. एके काळी पूर्वेचं ऑक्सफर्ड असा लौकिक असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला आजतागायत एकदाही महिला कुलगुरू लाभल्या नाहीयेत, ही बाब विशेष नोंद घेण्याजोगी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुंबई उच्च न्यायालयाचा एकनाथ शिंदेंना दणका

## ▸ नगरविकास मंत्री असताना घेतलेल्या निर्णयाला स्थगिती

**। मुंबई । महाईन्यूज ।**

'नागपूर इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट' (एनआयटी) भूखंडाच्या कथित गैरव्यवहार प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरविकास मंत्री असताना झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी संपादित केलेली जमीन १६ खासगी लोकांना भाडेतत्वावर देण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.



संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ट असताना ही जमीन भाडेतत्वावर देण्याचा निर्णय कसा घेतला? असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. याबाबत सरकारने आपली बाजू मांडवी, असा आदेशही न्यायालयाने दिला.

नागपूर इम्प्रूव्हमेंट ट्रस्टच्या भूखंडाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना झोपडपट्टीवासीयांच्या गृहनिर्माण योजनेसाठी संपादित केलेली जमीन १६ जणांना भाडेतत्त्वावर देण्याचा आदेश एकनाथ शिंदे यांनी नगरविकास मंत्री असताना दिला होता. त्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे.

शिंदे यांचा आदेश न्यायालयीन कामकाजातील हस्तक्षेप आहे, असा दावा ॲमिकस क्युरी ॲड. आनंद परचुरे यांनी केला होता. याबाबतची एक रीट याचिका त्यांनी न्यायालयात दाखल केली होती. त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने हा आदेश दिला.झोपडट्टीवासींयासाठी संपादित केलेल्या जमिनीचं वितरण करताना कथित गैरव्यवहार झाल्याचा अहवाल कॅगने दिला होता. त्यामुळे २००४ साली हे प्रकरण न्यायालयात गेलं होतं. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना महाविकास आघाडी सरकारमध्ये नगरविकास मंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी ही जमीन १६ जणांना भाडेतत्वावर देण्याचा आदेश दिला होता. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर ॲमिकस क्युरी ॲड. आनंद परचुरे यांनी न्यायालयात याचिका दाखल केली. नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती सुनील शुक्रे आणि न्यायमूर्ती एम. डब्ल्यू. चांदवानी यांनी भूखंड वितरणासंबंधी शिंदे यांच्या आदेशाला स्थगिती दिली.



# हिवाळी अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता

## सत्ताधारी आणि विरोधकांकडून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी

**।नागपूर । महाईन्यूज ।**

सीमाप्रश्न, पीक विम्यातील शेतकऱ्यांची फसवणूक, राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी, विकासकामांवरील स्थगिती आदी मुद्दय़ांवरून सरकारला घेरण्याची विरोधकांनी केलेली व्यूहरचना आणि त्यांना सडेतोड उत्तर देण्याची सरकारची तयारी यामुळे राज्य विधिमंडळाचे आज, सोमवारपासून सुरू होणारे हिवाळी अधिवेशन वादळी ठरण्याची चिन्हे आहेत. या अधिवेशनात महत्त्वाच्या प्रश्नांवरून विशेषत: राष्ट्रपुरुषांच्या अवमानावरून सरकारला घेरण्याचा इशारा विरोधकांनी दिला आहे.

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधारी आणि विरोधकांच्या स्वतंत्र बैठका पार पडल्या. सरकारच्या धोरणाच्या निषेधार्थ विरोधकांनी मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या चहापानावर बहिष्कार घातला.

या अधिवेशनात विरोधकांची एकजूट कायम दिसेल. सरकारचे अपयश लोकांसमोर उघडे पाडू तसेच महत्त्वाच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारण्याचा इशारा विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिला. तर, 'लग्न एकाशी आणि संसार दुसऱ्याशी' करणाऱ्या महाविकास आघाडी सरकारच्या काळात राज्याची आर्थिक स्थिती विचारात न घेता मनमानीपणे कारभार 'आमदनी अठन्नी आणि खर्चा रुपया' असा कारभार सुरू होता. आम्हाला मात्र या राज्याचा 'लवासा' करायचा नाही.म्हणूनच तत्कालीन सरकारच्या चुकीच्या कामांना स्थगिती दिली असून विरोधकांच्या सर्व प्रश्नांवर सभागृहात चर्चा करण्याची सरकारची तयारी असून जशास तसे उत्तर देण्याचा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला.

### पहिल्याच दिवशी मविआची बैठक

**हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीची बैठक नागपुरात आयोजित करण्यात आली असून या बैठकीला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत. हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात होत आहे. यानिमित्तानेविरोधी पक्षनेते अजित पवार यांची पत्रकार परिषद झाली. त्या वेळी त्यांनी ही माहिती दिली. ही बैठक दुपारी ४ वाजता होणार आहे, असेही सांगितले. उद्धव ठाकरे विधान परिषदेच्या कामकाजातही सहभागी होण्याची शक्यता आहे.दिली होती.**

# सीमाप्रश्नावरून अजित पवारांचा शिंदे सरकारवर हल्लाबोल

## पहिल्याच दिवशी सीमावादाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधक-आमने सामने

**।नागपूर । महाईन्यूज ।**

आजपासून विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सुरूवात झाली आहे. आज पहिल्याच दिवशी सीमावादाच्या मुद्द्यावरुन सत्ताधारी आणि विरोधक-आमने सामने आल्याचे बघायला मिळाले. विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सीमावादाचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्यांना उत्तर दिलं.अजित पवारांकडून सीमावादाचा मुद्दा उपस्थित

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी बोलता अजित पवारांकडून सीमावादाचा मुद्दा उपस्थित



करण्यात आला. "बेळगावात महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांवर दडपशाही सुरू आहे. अशावेळी महाराष्ट्र त्यांच्या पाठिशी उभा आहे. या विषयी अमित शहा यांच्याशी बैठक झाली असताना आणि बेळगावात कोणालाही अडवणार नाही, असे ठरलं असताना जिल्हाधिकारी त्यांच्या बंदी कशी आणू शकतात? गृहमंत्र्याबरोबर झालेल्या बैठकीला एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. मात्र, गृहमंत्र्यासमोर ठरलेलं कोण मोडत आहे, हे महाराष्ट्राच्या जनतेला सांगितलं पाहिजे. त्याच्या पुढची काय कारवाई केली जाणार, हे सुद्धा समजलं पाहिजे," असं अजित पवार म्हणाले.

"सीमावादाच्या मुद्द्यावरून राजकारण करू नये. राजकारण करण्यासाठी अनेक मुद्दे आहेत. आधीच्या सरकारने बेळगावातील गावासांठी असलेल्या योजना बंद केल्या होत्या. आम्ही त्या योजना पुन्हा सुरू केल्या. कालच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतही आम्ही सीमावासियांसाठी दोन हजार कोटींची योजना सुरू केली. मुळात सीमावासीयांच्या पाठिशी आपण ठामपणे उभं राहिलं पाहिजे", असेही ते म्हणाले.यावेळी बोलताना त्यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांच्या ट्वीटवरही प्रतिक्रिया दिली. " अमित शहांबरोबर झालेल्या बैठकीदरम्यान आम्ही कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना तुम्ही केलेले ट्वीट चुकीचं असल्याचे सांगितले आहे. त्यावर त्यांनी हे आमचं ट्वीट नाही सांगत नकार दिला.

हे ट्वीट ज्यांनी केलं आहे त्यांचीही माहिती त्यांना मिळाली आहे. या ट्वीटमागे कोणता पक्ष आहे, याचीही माहिती मिळेल," असंही एकनाथ शिंदें म्हणाले.

### अजित पवारांना मुख्यमंत्र्यांचे प्रत्युत्तर

**दरम्यान, अजित पवारांच्या टीकेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही प्रत्युत्तर दिलं आहे. "विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी जो मुद्दा मांडला आहे, तो महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. या मुद्द्यावर पहिल्यांदाच देशाच्या गृहमंत्र्यांनी मध्यस्थी केली आहे. गेल्या अनेक वर्षांमध्ये हे पहिल्यांदाच घडले आहे. या बैठकीत आम्ही सीमावादाच्या मुद्द्यावर ठोस भूमिका घेतली होती. महाराष्ट्रातील वाहनांवर होणारे हल्ले खपवून घेणार नाही, हे आम्ही स्पष्टपणे सांगितले होते. अमित शहा यांनी कर्नाटकच्या गृहमंत्र्यांनाही समज दिली होती. अमित शहा यांनी स्वत: पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारची भूमिका मांडली होती", अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.**

# फिरोजपूरमध्ये शेतकऱ्यांवर लाठीमार!

## शेतकरी संघटनांची धरणे आंदोलनाला सुरुवात, आंदोलकांनी तोडले बॅरिकेड्स

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

फिरोजपूरच्या जीरामधील मन्सूर वाला गावातील दारूच्या फॅक्ट्रीबाहेर जमलेल्या शेतकरी संघटनांवर पोलिसांनी लाठीमार केल्याची माहिती समोर येत आहे. सोमवारी शेतकरी संघटनांनी धरणे आंदोलनाला सुरुवात केली होती. त्यावेळी शेतकऱ्यांनी सरकारचा निषेध केला. मात्र, पोलिसांनी आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी आंदोलकांनी पोलिसांचे बॅरिकेड्स तोडले. त्यानंतर संतापलेल्या पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला.



मिळालेल्या माहितीनुसार, फिरोजपूरमधील मालब्रोज दारू कारखान्यासमोर शेतकरी धरणे आंदोलन करत होते. त्यावेळी धरणे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना लख्खा सदन संबोधित करत होते. तसेच, दारुच्या कारखान्याबाहेर अखंड पठण सुरू होते. त्यावेळी मोठ्याप्रमाणात लोकही त्यामध्ये सहभागी होत होते. यावेळी एसएसपी कंवरदीप कौर उपस्थित होत्या.

या पठणाच्या पार्श्वभूमीवर एसएसपी कंवरदीप कौर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, दारुच्या कारखान्यासमोर धरणे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना हटवले. परंतु, अखंड पाठ सुरू असल्यामुळे येणाऱ्या नागरिकांना थांबवले जात नाही. त्याचवेळी पोलीस शेतकऱ्यांना धक्काबुक्की करून धार्मिक मेळाव्याला पोहोचू देत नसल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून अफवा पसरवली जात आहे.

**या पठणाच्या पार्श्वभूमीवर एसएसपी कंवरदीप कौर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, दारुच्या कारखान्यासमोर धरणे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना हटवले. परंतु, अखंड पाठ सुरू असल्यामुळे येणाऱ्या नागरिकांना थांबवले जात नाही. त्याचवेळी पोलीस शेतकऱ्यांना धक्काबुक्की करून धार्मिक मेळाव्याला पोहोचू देत नसल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून अफवा पसरवली जात आहे.**

दरम्यान, रविवारी मध्यरात्री पोलिसांच्या वाहनांना घेराव घालून कायद्याचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलक शेतकऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली. रविवारी पोलिसांनी आंदोलकांचे तंबू उखडून टाकले आणि सामान हटवले. त्यानंतर दारूच्या कारखान्याकडे जाणाऱ्या लिंक रोड आणि महामार्गाच्या प्रत्येक भागावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

जिल्हा प्रशासनाने रविवारी केलेल्या या कारवाईनंतर सोमवारी शेतकरी संघटना आणखी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. त्यानंतर या प्रकरणी पोलिसांनी २५० जणांवर गुन्हा दाखल केला असून, २७ जणांना ताब्यात घेतले आहे.

---

# नक्षलवादाला घाबरून गडचिरोलीत औद्योगिक विकास थांबणार नाही

## विधानसभेत मुख्यमंत्री शिंदेंची ग्वाही

**।मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

नक्षलवादाला घाबरून गडचिरोलीतला औद्योगिक विकास थांबणार नाही अशी ग्वाही आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. सुरजागड स्टील प्रकल्पामुळे सुमारे सहा हजार जणांना रोजगार मिळाला आहे. विधानसभा सदस्य धर्मराव बाबा आत्राम यांना आवश्यक ती सुरक्षा पुरविण्यात येईल, असही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितले.

विधानसभा सदस्य आत्राम यांना मिळालेल्या धमकीबाबत विरोधी पक्षनेते अजित पवार, सदस्य दिलीप वळसे पाटील, नाना पटोले, जितेंद्र आव्हाड यांनी मुद्दा उपस्थित केला होता. यासंदर्भात निवेदन करताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड स्टील प्रकल्पामुळे या भागाचा विकास होण्यास



मदत होणार आहे. या प्रकल्पामुळे सहा हजार जणांना रोजगार मिळाला असून कोनसरी येथील प्रकल्प उभारल्यानंतर दहा हजार जणांना रोजगार मिळेल, असेही त्यांनी सांगितले. विधानसभा सदस्य आत्राम यांच्या सुरक्षेत कुठलीही कमतरता राहणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिले.

**आत्राम यांना नक्षलवाद्यांची धमकी**

दरम्यान विधानसभेत आत विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी थेट नक्षवाद्यांची धमकी येत असल्याची माहिती दिली. अजित पवार म्हणाले की, सूरजागड लोहखनीज प्रकल्पामुळे प्रशासनात तणाव निर्माण झाला आहे. नक्षल्यांची धमकी लक्षात घेता, आत्राम यांची सुरक्षा वाढवावी, प्रशासनाची काळजी घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आत्राम यांना आलेल्या धमकीची गंभीर दखल शासनाने घेतली असून त्यांना आवश्यक सुरक्षा दिली जाईल असे आश्वासन दिले. याच मुद्द्यावर दिलीप वळसे पाटील यांनीही विधिमंडळात भाष्य केलं. सूरजागड प्रकल्प बंद पाडण्यासाठी नक्षल्यांनी हालचाली सुरू केल्या आहेत. तिथे बेरोजगारांना मिळालेला रोजगार हिरावल्या जाणार नाही याबद्दल आश्वस्त करावे, अशी मागणी दिलीप वळसे पाटील यांनी केली आहे.

यावर जूनपर्यंत सुरजागडचा पहिला टप्पा सुरू होणार असून अजून २० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. सुरूवातीला असलेला लोकांचा विरोधही आता मावळत चालला आहे.

# आज रामलीला मैदानावर गर्जना रॅली

## 50 हजार शेतकरी होणार सहभागी

**।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारतीय किसान संघाने आज रामलीला मैदानावर किसान गर्जना रॅलीचं आयोजन केलं आहे. यामध्ये जवळपास ५५ हजार शेतकरी आणि सामान्य वर्ग सहभागी होणार आहेत. यासाठी जवळपास ८०० बस आणि ४ हजार खासगी गाड्यांनी शेतकरी दाखल होणार आहेत. यामुळे रामलीला मैदान आणि आजूबाजूच्या परिसरात सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी अडकायचं नसेल तर रामलीला मैदानाजवळून न जाण्याचं आवाहन पोलिसांकडून करण्यात आलं आहे.



भारतीय किसान संघाचे अध्यक्ष रतन सिंह कानीवाडा यांनी सांगितलं की, चार मागण्यांसाठी रॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. पिकांचं मूल्य ठरवणे, कृषी यंत्र जीएसटीमुक्त करणे, किसान सन्मान योजना बारा हजार करणे, प्रत्येक शेतापर्यंत पाणी पोहोचवणे आदी मागण्यांसाठी गर्जना रॅली आयोजित करण्यात आली आहे.

या रॅलीला देशभरातील ५० हजारांहून अधिक शेतकरी सहभागी होणार आहे. या शेतकऱ्यांकडून आपल्या मागण्या सराकरकडे मांडण्यात येणार आहेत. यासाठी ४ हजारांवर गाड्या या ठिकाणी येऊ शकतात. तर, अनेक ठिकाणांहून शेतकरी रामलीला मैदानावर येण्यास सुरुवात झाली आहे. तर, रविवार सायंकाळपासूनच शेतकरी रामलीला मैदानावर जमायला सुरुवात झाली आहे.

दिल्ली ट्रॅफिक पोलीसचे सेंट्रल रेंजचे उपायुक्त चंद्रकुमार यांनी सांगितलं की, महाराजा रणजीत सिंह मार्ग, मिंटो रोड गोलचक्कर, अजमेरी गेट, चमनलाल मार्ग, दिल्ली गेट, जेएलएन मार्ग, कमला मार्केट गोलचक्कर हमदर्द चौकतक, भावभूति आणि पहाडगंज चौक येथून वाहतूक वळवण्यात आली आहे.

वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी पोलिसांनी महत्त्वाचा सल्लाही दिला आहे. आजच्या दिवशी खासगी गाड्यांचा वापर न करता सार्वजनिक परिवनह वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## “तू सत्य मानणार नाहीस आणि...” रुचिरा जाधव



बिग बॉस मराठीचे चौथे पर्व हे सुपरहिट ठरताना दिसत आहे. यंदाच्या पर्वाची सातत्याने चर्चा पाहायला मिळत आहे. ‘बिग बॉस मराठी’च्या चौथ्या पर्वामध्ये रुचिरा जाधव आणि डॉ. रोहित शिंदे ही जोडी एकत्र सहभागी झाली होती. सुरुवातीला गोडीगुलाबीने वावरणाऱ्या या जोडीमध्ये हळूहळू मतभेद व्हायला लागले. या वादानंतर सुरुवातीला रुचिरा जाधव ही घराबाहेर पडली. त्यानंतर काही आठवड्यांनी रोहित शिंदे बाहेर पडला. सध्या त्या दोघांच्याही रिलेशनशिपमध्ये फूट पडली आहे. त्यात रुचिराने शेअर केलेल्या एक पोस्टने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. बिग बॉस मराठीच्या घरात आल्यानंतर रोहित आणि रुचिरा एकमेकांबरोबर छान मिळून मिसळून राहत होते. पण काही दिवसांनी टास्क खेळताना, घरात वावरताना त्यांच्या मतभेद झाले. त्यांचा हा वाद वाढतच गेला. रुचिरा नॉमिनेट झाल्याने त्यांच्यातील वाद आणखी चिघळला.या कार्यक्रमामधून बाहेर पडल्यानंतर तिने रोहितला इन्स्टाग्रामवरुन अनफॉलो केले. यानंतर तिने काहीही केलं तर मी त्याला फॉलो करणार नाही, असेही जाहिरपण सांगितले. यामुळे त्यांच्या रिलेशनशिपमध्ये फूट पडल्याची बोललं जात आहे. त्यातच आता रुचिराने रोहितच्या आणि तिच्या नात्यात सर्व काही बिनसल्याचे संकेत दिले आहेत.

रुचिराने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने तिच्या हस्ताक्षरातील काही ओळी लिहिल्या आहेत. या ओळी हिंदीत असून तिने रात्री पावणेदोनच्या सुमारास त्या लिहिल्या आहेत. “सत्य तुला माहित आहे, तेच सत्य मला माहिती आहे. पण सत्य तर हे आहे की सत्य फक्त मला ठाऊक आहे. पण तू सत्य मानणार नाहीस आणि मी ते सोडणार नाही”, असे तिने यात म्हटले आहे. या बरोबरच तिने तिची सही, आजची तारीख आणि वेळ असेही लिहिले आहे.

## जान्हवी कपूर पुन्हा दिसली एक्स बॉयफ्रेंडसह



बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर सध्या शिखर पहाडियाबरोबरच्या नात्यामुळे चर्चेत आहे. जान्हवी कपूरने पुन्हा एकदा एक्स बॉयफ्रेंड शिखरला डेट करण्यास सुरुवात केल्याचे सांगितले जात आहे. शनिवारी शिखर आणि जान्हवी दिल्लीत एका कार्यक्रमादरम्यान एकत्र दिसले. या पार्टीतील एक व्हिडिओही समोर आला आहे, जो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये जान्हवी कपूर स्ट्रॅपलेस ड्रेसमध्ये दिसत आहे आणि त्याला मॅचिंग कलरचा ओव्हरकोट घातला आहे आणि केस मोकळे सोडले आहेत. तर शिखर चमकदार जॅकेटमध्ये झळकत आहे. व्हिडिओमध्ये दोघेही एका व्यक्तीशी बोलताना दिसत आहेत. हा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

शिखर पहाडिया हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांचा नातू असल्याची माहिती समोर आली आहे. रिपोर्टनुसार, त्याने जान्हवी कपूर कपूरला डेट केले आहे. मात्र, काही काळानंतर दोघे वेगळे झाले. करण जोहरने त्याच्या ‘कॉफी विथ करण ७’ या शोमध्ये दोघांमधील नात्याची पुष्टी केली होती. याआधीही जान्हवी कपूर आणि शिखर मुंबईत बऱ्याचदा एकत्र दिसले आहेत.

संजय पहाडिया आणि स्मृति शिंदे यांच्यापोटी जन्मलेला शिखर हा उद्योगपती आहेच शिवाय तो एक उत्तम पोलो प्लेयर आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याने भारताचं नेतृत्वदेखील केलं आहे. रीजेंट युनिव्हर्सिटी ऑफ लंडनमधून ग्लोबल फायनान्शियल मॅनेजमेंटमध्ये त्याने शिक्षण घेतलं आहे.

## मिसेस वर्ल्ड २०२२ सरगम कौशल

भारताच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. भारताच्या सरगम कौशलने ‘मिसेस वर्ल्ड २०२२’ ही स्पर्धा जिंकली आहे. शनिवारी संध्याकाळी वेस्टगेट लास वेगास रिसॉर्ट आणि कॅसिनो येथे झालेल्या समारंभात सरगम विजेती ठरली. तब्बल ६३ स्पर्धकांपैकी सरगमने हा खिताब पटकावला. अमेरिकेच्या मिसेस वर्ल्ड २०२१ शेलिन फोर्ड यांनी सरगमला विजेती घोषित करत मिसेस वर्ल्डच्या ताजने तिला सन्मानित केलं. या स्पर्धेत मिसेस पॉलिनेशिया फर्स्ट रनर अप ठरली, तर मिसेस कॅनडा सेकंड रनर अप ठरली.

सरगम कौशलने हा खिताब जिंकल्यानंतरचा आनंद शेअर केला. कौशलने एक व्हिडीओ शेअर केला आणि तब्बल २१ वर्षांनी हा खिताब जिंकल्यानंतर ती किती आनंदी आहे हे सांगितलं. “आम्हाला २१-२२ वर्षांनी ताज परत मिळाला आहे. मी खूप उत्साहित आहे. लव्ह यू इंडिया, लव्ह यू वर्ल्ड,” असं सरगम म्हणाली.सरगम कौशल ही उच्चशिक्षित आहे. तिने इंग्रजी साहित्यात पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण केलंय. सरगमचे २०१८ मध्ये लग्न झाले होते. तिचे पती भारतीय नौदलात आहेत. तिने स्वतः विशाखापट्टणममध्ये शिक्षिका म्हणून काम केलं आहे. डॉ. अदिती गोवित्रीकर यांनी २००१ साली ‘मिसेस वर्ल्ड’चा खिताब जिंकला होता. दरम्यान, यंदाच्या मिसेस वर्ल्डमध्ये अदिती ज्युरी सदस्य म्हणून उपस्थित होत्या.




मिसेस वर्ल्ड ही विवाहित महिलांसाठीची सौंदर्य स्पर्धा आहे. या स्पर्धेची सुरुवात १९८४ मध्ये झाली होती. सुरुवातीला या स्पर्धेला मिसेस वुमन ऑफ द वर्ल्ड असं नाव देण्यात आलं होतं. पण १९८८ पासून ही स्पर्धा मिसेस वर्ल्ड म्हणून ओळखली जाऊ लागली आहे. या स्पर्धेच्या सुरुवातीपासून ते आतापर्यंत भारताने दोन वेळा हा खिताब जिंकला आहे.

## “अपूर्वा नाटकी असल्याचं दाखवत असली तरी...” अमृता देशमुख

बिग बॉस मराठीच्या गेल्या आठवड्यात दोन सदस्य घराबाहेर जाणार असल्यामुळे मोठा ट्विस्ट आला होता. त्यात विकास सावंत शनिवारी (१७ नोव्हेंबर) बिग बॉसच्या घरातून बाहेर पडला. त्यानंतर आता पुण्याची टॉकरवडी अमृता देशमुख हिचाही प्रवास संपुष्टात आला आहे. यानंतर नुकतंच राजश्री मराठीला दिलेल्या मुलाखतीत अमृता देशमुखने अपूर्वा नेमळेकर ही नाटकी असल्याचे म्हटलं आहे.




अमृता देशमुखने नुकतंच राजश्री मराठीला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला बिग बॉसच्या घरात सर्वात जास्त नाटकी कोण आहे असं तुला वाटतं? असा प्रश्न विचारला होता. त्यावर तिने एकाही क्षणाचा विलंब न करता अपूर्वा असे नाव घेतले.दरम्यान ‘बिग बॉस’च्या घरातील प्रवास संपल्याने अमृताला खेळातून बाहेर पडावे लागेल.

सुरुवातीच्या दिवसांत अमृताचा घरातील वावर फार कमी होता. पण नंतर तिने स्वतःला सिद्ध करत खेळ खेळायला सुरुवात केली होती. टास्कदरम्यानही तिची आक्रमकता दिसून आली होती. पहिल्या आठवड्यापासून प्रत्येक नॉमिनेशन टास्कमध्ये अमृताला घरातील सदस्यांनी नॉमिनेट केलेलं पाहायला मिळालं.

## वृशिका मेहता लवकरच होणार विवाहबद्ध

‘सध्या सर्वत्र लग्नाचा माहोल आहे. अनेकजण विवाहबंधनात अडकत आहेत. सेलिब्रिटीही याला अपवाद नाहीत. गेल्या एका महिन्यात हिंदी आणि मराठी मनोरंजन सृष्टीतील अनेक कलाकार विवाह बंधनात अडकले आहेत, तर येत्या काळात काही लग्न करणार आहेत. आता या यादीत एका लोकप्रिय हिंदी अभिनेत्रीचा समावेश झाला आहे.

‘ये रिश्ता क्या कहलाता है’ फेम अभिनेत्री वृशिका मेहता हिने नुकतीच सोशल मीडियावरून तिच्या चाहत्यांना एक गुड न्यूज दिली. तिने नुकताच साखरपुडा केल्याचं सोशल मीडिया वरून जाहीर केलं. सौरभ घेडिया तिच्या होणाऱ्या नवऱ्याचं नाव आहे.



# दोघांचा सामना तिसऱ्याचा लाभ!

## द. आफ्रिकेचा पराभव, भारताला फायदा; दुसऱ्या स्थानी झेप

**। कतार ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



रविवारी एकीकडे संपूर्ण जगाचं लक्ष कतारमधील अर्जेंटिना विरुद्ध फ्रान्सदरम्यानच्या फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम सामन्याकडे लागलं होतं. मात्र दुसरीकडे आयसीसीच्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या गुणतालिकेमध्ये भारताने थेट दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. भारताने बांगलादेशला १८८ धावांनी धूळ चारल्याने तसेच ब्रिस्बेनच्या मैदानावर पूर्णपणे गोलंदाजांचे वर्चस्व राहिलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाने रविवारी दुसऱ्याच दिवशी पाहुण्या दक्षिण आफ्रिकेवर सहा गडी राखून विजय मिळवल्याने क्रमवारीत हा बदल झाला आहे. केवळ दोन दिवसांतच दोन्ही संघांचे मिळून तब्बल ३४ फलंदाज गारद झाले. द. आफ्रिकन संघ १५२ आणि ९९ धावांवर बाद झाला. चार संघाच्या या कामगिरीमुळे आयसीसीच्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या गुणतालिकेत मोठे फेरफार घडलेत.

विशेष म्हणजे या दोन्ही सामन्यांआधी भारत या गुणतालिकेमध्ये चौथ्या तर दक्षिण आफ्रिकेचा संघ दुसऱ्या स्थानी होता. मात्र पाचच दिवसांमध्ये हे चित्र पालटलं असून भारताने आता दोन स्थानांनी झेप घेतली आहे. दोन अव्वल संघ या स्पर्धेमध्ये अंतिम सामना खेळणार आहेत. सध्या ऑस्ट्रेलियन संघ या गुणतालिकेमध्ये अव्वल स्थानी आहे. ७६.८२ टक्क्यांसहीत ऑस्ट्रेलियाने अव्वल स्थान कायम राखलं आहे. १३ पैकी ९ सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाने विजय मिळवला आहे.भारत सध्या ५५.७७ टक्क्यांसहीत दुसऱ्या स्थानी आहे. भारताने १३ पैकी ७ सामने जिंकले आहेत. तर दोन सामने अनिर्णित राहिले आहेत. दक्षिण आफ्रिकेचा ऑस्ट्रेलियाकडून दारुण पराभव झाल्याने त्यांची क्रमवारीत मोठी घसरण झाली आहे. दक्षिण आफ्रिकेची टक्केवारी ५४.५५ इतकी आहे. श्रीलंकेची या गुणतालिकेमध्ये एका स्थानेने घसरण झाली असून ते सध्या चौथ्या स्थानावर आहेत. त्यांच्या विजयाची टक्केवारी ५३.३३ इतकी आहे.

इंग्लंड आणि पाकिस्तान सध्या कराचीमधील नॅशनल स्टेडियमवर तिसऱ्या आणि मालिकेतील अंतिम कसोटीसाठी घाम गाळत आहेत. इंग्लंड पाचव्या स्थानी आहे. ४४.४४ टक्क्यांसहीत इंग्लंड पाचव्या स्थानी असून त्या खालोखाल ४२.४२ टक्क्यांसहीत पाकिस्तान आहे. इंग्लंडने पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेत २-० ने अजेय आघाडी घेतली आहे. रावळपिंडी आणि मुल्तान कसोटी सामना इंग्लंडने जिंकला आहे.

# मेस्सीच्या गोलमुळे 'या' कंपनीचे शेअर्स भिडले गगनाला

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



जगाला फुटबॉलचा नवा चॅम्पियन मिळाला आहे. फिफा विश्वचषक (FIFA 2022) विजेतेपदाच्या सामन्यात अर्जेंटिनाने पेनल्टी शूटआऊटमध्ये फ्रान्सचा ४-२ असा पराभव केला. या विजयासह अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सीचे विश्वचषक जिंकण्याचे स्वप्नही पूर्ण झाले. मेस्सीने संपूर्ण विश्वचषकात आपल्या खेळावर वर्चस्व गाजवले आणि अंतिम फेरीतही एकूण तीन गोल केले.


विश्वचषकाच्या अंतिम सामन्याकडे चाहत्यांचे लक्ष लागले होते. यासोबतच ज्या गुंतवणूकदारांनी नायके आणि आदिदाससारख्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये गुंतवणूक केली होती, त्यांनीही याकडे डोळे लावले होते. आदिदास अर्जेंटिना प्रायोजक आणि नायके फ्रेंच संघ प्रायोजक आहेत.फिफा विश्वचषकाच्या अंतिम सामन्याच्या निकालाचा परिणाम आदिदास आणि नायकेच्या शेअर्सवर दिसून येत आहे. अर्जेंटिनाच्या संघाने आदिदासची जर्सी परिधान करून स्पर्धेत प्रवेश केला आणि विजेतेपदही पटकावले. यानंतर आदिदासच्या शेअर्समध्ये तेजी आली. कंपनीचे शेअर्स १.९३ टक्क्यांनी वाढून युरो १२१.३० (फ्रँकफर्ट स्टॉक एक्सचेंज) वर बंद झाले. दुसरीकडे, संघाच्या पराभवानंतर फ्रेंच प्रायोजक नायकेचे शेअर्स कोसळले.

# 'हाफ मॅरेथॉन' ला पिंपरी-चिंचवडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

## यशदा रियालिटी ग्रुप, नगरसेवक शत्रुघ्न काटे युथ फाउंडेशन आणि किशान स्पोर्ट्स इंडिया प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा

**। पिंपरी ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**





**पिंपळे सौदागर येथील कै.बाळासाहेब कुंजीर क्रीडांगण याठिकाणी यशदा रियालिटी ग्रुप, नगरसेवक शत्रुघ्न काटे युथ फाउंडेशन आणि किशान स्पोर्ट्स इंडिया प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "पिंपरी चिंचवड हाफ मॅरेथॉन २०२२" ही स्पर्धा रविवार दि.१८ रोजी यशस्वीपणे पार पडली. पहाटे ५ वा. गुलाबी थंडीत पिंपरी चिंचवडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ही मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी केली.**

कै बाळासाहेब कुंजीर क्रीडांगण पासून सुरु झालेली ही मॅरेथॉन BRTS मार्ग शिवार चौक, कोकणे चौक, PK चौक, गोविंद यशदा चौक, सुदर्शन चौक, नाशिकफाटा मार्गे पुन्हा फिरून याच मार्गे कै. बाळासाहेब कुंजीर क्रीडांगणावर या मॅरेथॉनचे समापन झाले. या स्पर्धेमध्ये ५ किमी, १० किमी आणि २१ किमी या तिन्ही ग्रुप कॅटेगरीमध्ये राज्यातील अनेक जिल्ह्यामधील सुमारे ३५०० मॅरेथॉनपटूनी सहभाग घेतला होता. लहानग्यांपासून ते वयोवृद्धापर्यंत सर्व जण यावेळी मनसोक्त धावले.

या स्पर्धेमध्ये २१ किमी गट (पुरुष) किरण गांढूळे, अनुराग कोनकर, अंकुश गुप्ता आणि (महिला) ऐश्वर्या खलाडकर, समीक्षा खरे, शर्मिला कदम यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणी तृतीय क्रमांक पटकावले.

या स्पर्धेमध्ये १० किमी गट (पुरुष) अभिषेक देवकाते, प्रधान किरुळकर, मनोज मूंड आणि (महिला) ज्योती चव्हाण, प्रियांका चवारकर, वृषाली उत्तेकर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणी तृतीय क्रमांक पटकावले. या स्पर्धेमध्ये ०५ किमी गट (पुरुष) अजय क्षीरसागर, प्रणव पाटील, मोहिते यादव आणि (महिला) विनया मालुसरे, गायत्री चौधरी, शेख इस्माईल यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणी तृतीय क्रमांक पटकावले. यावेळी धावपटूचा उत्साह वाढावा म्हणून जागोजागी ढोल वाजवून त्यांचे स्वागत केले जात होते. स्पर्धेदरम्यान चार ठिकाणी एनर्जी स्टेशन उभे करण्यात आले होते आणि तिथून स्पर्धकांना पाणी, एनर्जी ड्रिंक व फळे पुरविण्यात आले. स्पर्धेदरम्यान रूग्णवाहिकाही तैनात करण्यात आली होती. स्पर्धेसाठी साधारण १०० स्वयंसेवक उपस्थित होते.

परंतु यावर्षीच्या मरेथॉनमध्ये सर्वांचे लक्ष वेधले ते कु.जय या अंध मुलाने ५ किमी गटात त्याने धावत स्पर्धा पुर्ण केली आणि सर्वांचे मन जिंकले. आयोजकांकडून कु.जय याला सन्मानित करण्यात आले.

यावेळी आयोजक शत्रुघ्न काटे, वसंत काटे, शंतणू प्रभुणे, किरण काकुलथे, सुखदेव सिंग तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते, मोरेश्वर शेडगे, संदिप कस्पटे, शशिकांत कदम, प्रभाकर वाघेरे, जयनाथ काटे, भानुदास काटे पाटील, प्रकाश झिंजुर्डे, बाळासाहेब काटे, विजय भिसे, धनंजय ढोरे, कौस्तुभ राडकर, कविताजी रेड्डी, कैलास कुंजीर, संजय भिसे, कुंदाताई भिसे, रोहिदास गवारे, विजय काटे, सागर काटे, संदेश काटे पाटील, रमेश काटे, राहुल काटे, प्रविण कुंजीर, बाळकृष्ण परघळे, दिपक गांगुर्डे, शंकर चोंधे, रेडिओ जॉकी आर जे तरुण, राजू शेलार, गिरीष रोहिडा व इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिव छत्रपती क्रीडा पुरस्कार विजेती अपर्णाजी प्रभुदेसाई आणि सागर बिरारी यांनी केले.